# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक १३/३/२००७ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२४) इतिवृत्त**

**मंगळवार** दिनांक **१३ मार्च २००७** रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती **श्री.रेणुकादास (राजू) वैद्य** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे **दुपारी १२.०५ वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त, नगर सचिव व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

1. श्री. गायकवाड दिलीप नारायण
2. श्री. गवळी रविकांत काशीनाथ
3. श्री. दाभाडे मिलींद यशवंत
4. श्री. पांडे विनायक प्रभाकर
5. श्री. शिरसाट संजय पांडूरंग
6. डॉ. आशा उत्तमराव बिनवडे
7. श्री. तुपे त्रिंबक गणपतराव
8. श्री. दाभाडे हिंमतराव साळूबा
9. श्री. बमणे पुनमचंद सोनाजी
10. श्री. मो. जावेद मो. इसाक
11. श्री. हाजी शेरखान अ. रहेमान

**विषय क्र.279 :**

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 अन्वये सादर केलेल्या, सन 2006-2007 चे सुधारीत व सन 2007-2008 चे मुळ अर्थसंकल्पावर विचार विनिमय करणे.**

संवाद :

श्री.मो.जवेद मो.इसहाक : सभेला अधिकारी उपस्थित नाहीत. सभा तहकूब करावी.

श्री.मुजीब खान : अर्थसंकल्पावर ही सभा असून सर्व सदस्य उपस्थित आहे परंतु अनेक अधिकारी बैठकीला उपस्थित नाहीत. अधिकाऱ्यांची काही जबाबदारी आहे की नाही. सदस्यांच्या प्रश्नाचा खूलासा कोण करणार आहे. जेपर्यंत अधिकारी येत नाहीत तोपर्यत सभेचे कामकाज सुरू करू नये अशी विनंती आहे, नसता सभा तहकूब करावी.

श्री.मो.जवेद मो.इसाक : वर्षभरात येणारे उत्पन्न व खर्च यावर चर्चा करणार आहोत. लेखाधिकारी सभेला उपस्थित नाहीत. जेउपस्थित नाही त्यांचेवर कार्यवाही करावी.

श्री.मधुकर सावंत : बजेट बूक सदस्यांना मिळालेले आहे. महत्वाची बैठक असून खुलासा करण्यासाठी कोण अधिकारी उपस्थित आहे.

मा. सभापती : सभागृहात स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा कोण करणार आहे. उपआयुक्त यांनी खूलासा करावा.

उपआयुक्त (प्र) : ०५ मिनिटांच्या अवधीत मा. आयुक्त येत आहेत.

श्री.मुजेब खान : जिल्हा परीषदेच्या निवडणुकीच्या प्रचारासाठी काही सदस्य गेलेले होते त्यांना अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ मिळालेला नाही. सभा तहकूब करून नंतर घेण्यात यावी.

श्री.मधुकर सावंत : पाच ते सहा दिवसांपूर्वी बजेट पुस्तक मिळालेले आहे. जिल्हा परीषदेची निवडणूक असल्यामुळे प्रचारासाठी सदस्य गेलेले होते. यावर अभ्यास करता आला नाही. सर्व विकासाचे प्रस्ताव यात आहेत. सभा तहकूब करून नंतर घेण्यात यावी.

श्री. त्र्यंबक तुपे : कोणत्या प्रभागासाठी किती बजेट ठेवण्यात आले याची माहिती पुढील बैठकीच्या वेळी सादर करण्याचे आदेशीत करावे. आजची सभा तहकूब करावी.

मा. सभापती : अर्थसंकल्पावर अनेक सदस्यांची बोलण्याची इच्छा आहे. परंतु यावर सदस्यांनी अभ्यास केला नाही म्हणून वेळ मागून घेतलेली आहे. सभागृहाच्या भावना लक्षात घेता आजची सभा तहकूब करण्यात येते. यानंतर सभेची तारीख व वेळ निश्चित करून अर्थसंकल्पावर सभा आयोजित केली जईल.

आजची सभा तहकूब केल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद